प्रेसनोट दि.०७/०८/२०१९

## सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर

## विधीसंघर्षग्रस्त बालक व पालकांची समुपदेशन बैठक पोलीस स्टेशन या ठिकाणी घेण्यात आली.

आज दि. ०७/०८/२०१९ रोजी १७.०० ते १८.१५ वा सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे मा. बाल न्यायमंडळ समिती, येरवडा, पुणे यांचे सदस्य तसेच लाईफ स्कुल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री अमित वर्दे यांचे उपस्थितीतीमध्ये मा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री दुर्योधन पवार आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे), दादा गायकवाड, सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर हद्दीमधील विधीसंघर्षग्रस्त बालक व बालकांचे पालक यांची बैठक आयोजीत करुन त्यांना गुन्हेगारी विश्व, भविष्यातील नव नविन संधी तसेच सायबर गुन्हे यांचे विषयी समुपदेशन केले. तसेच बालकांमध्ये शरीस सदृढ व बौध्दीक विकास याबाबत मार्गदर्शन केले. तसेच संघटीत गुन्हेगारीपासुन परावृत्त राहणेकामी कानमंत्र दिले. त्याबाबत विधीसंघर्षग्रस्त बालकांचे पालकांनी आभार व समाधान व्यक्त केले आहे.

